ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# आद्य संतकवयित्री महदंबा : चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. माधव बसवंते**
**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख ,**
**राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड.**

**सारांश :**




महानुभाव संप्रदायातील एक प्रमुख आद्य संतकवयित्री म्हणून महदंबेचा उल्लेख करावा लागतो. महानुभाव संप्रदायात चक्रधर स्वामींच्या सहवासातून महदंबेचे व्यक्तिमत्त्व अधिक फुलत गेले. स्वामी चक्रधरांच्या स्फूर्तीमुळेच महदंबेला काव्य लेखनाची प्रेरणा मिळाली. महदंबेला दादोस, चक्रधरस्वामी आणि गोविंदप्रभू यांचा सहवास लाभला होता. आपल्या भक्तीच्या बळावर महदंबेने संत चळवळीमध्ये आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. धर्माचा प्रचार व प्रसार करणारी एक तत्त्वनिष्ठ स्त्री म्हणून महदंबेचे कार्य उल्लेखनीय आहे. महदंबेच्या 'धवळे'मुळेच तिला आद्य मराठी कवयित्रीचा मान प्राप्त झाल्याचे समीक्षकांचे म्हणणे आहे. महदंबेने आपले संपूर्ण आयुष्य चक्रधर स्वामींच्या चिंतनात व महानुभाव पंथांच्या कार्यासाठी समर्पित केल्याचे दिसून येते. महदंबेने आपल्या कर्तृत्वातून स्त्री जीवनाचा खरा आदर्श दाखवून दिला आहे. चक्रधर स्वामींना अपेक्षित असलेल्या आचारधर्माचे कठोरपणाने पालन करणारी स्त्री म्हणून महदंबेचा निर्देश करावा लागतो, म्हणून महदंबेचे जीवन एका आदर्श जीवनाचा मानबिंदू ठरला आहे. कवयित्री महदंबा यांनी धवळे, मातृकी रूक्मिणी स्वयंवर, गर्भकांड ओव्या, स्फूटपदे या काव्यरचनांचे लेखन केले आहे.

**बीजसंज्ञा –** महानुभाव पंथाचे स्वरूप, महदंबेचे चरित्र, महदंबेची काव्यरचना

## प्रास्ताविक

यादव रामदेवांच्या शेवटच्या कालखंडात महाराष्ट्रामध्ये चक्रधर स्वामींचा उदय झाला होता. चक्रधर स्वामींनी तेराव्या शतकात महाराष्ट्रात महानुभाव पंथांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडविण्याचा जो प्रयत्न केला होता, त्या परिवर्तनाच्या कार्यात कवयित्री महदंबा यांचे उल्लेखनीय योगदान आहे. चक्रधर स्वामी हे समतावादी संत व क्रांतिकारक म्हणून ओळखले जातात. अनेकांनी त्यांना अवतारी पुरूष मानल्या जात असले, तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व हे खऱ्या अर्थाने समाज सुधारकांचे होते. चक्रधर स्वामी हे सामाजिक परिस्थितीचे द्रष्टे होते. महानुभाव पंथात गद्य व पद्य वाङ्मयाचेही लेखन करण्यात आले आहे. महानुभाव पंथातील लेखन हे तत्त्वज्ञानात्मक आहे. या पंथात जातिभेद व स्त्री–पुरूष भेदही मान्य नाही. हा पंथ कृष्णभक्त असून कृष्णाचे पाच अवतार ते मानतात. म्हाइंभट हे मराठीतील आद्य चरित्रकार मानले जातात, तर महदंबा ही आद्य कवयित्री होय. या संप्रदायामध्ये महानुभाव, वारकरी व रामदासी हे तीन वैष्णव पंथ आहेत. हा पंथ पंचकृष्णांच्या वचनांना प्रमाण मानणारा आहे. महानुभाव पंथाने मराठी भाषेला 'शास्त्र काट्याची कसोटी' प्राप्त करून दिल्याचे म्हटले जाते.

## महानुभाव पंथाचे स्वरूप

नाथपंथ, दत्तपंथ, वारकरी पंथ, समर्थ पंथ, महानुभाव पंथ यासारखे महाराष्ट्रात विविध संप्रदाय आहेत. याच संप्रदायामधील महानुभाव हा एक प्रमुख संप्रदाय आहे. साधारणतः तेराव्या शतकात हा महानुभाव संप्रदाय उदयाला आला.

महानुभाव म्हणजे 'महान अनुभावस्तेजोबलं वा यस्य स महानुभावः' ज्याचा अनुभव महान आहे, ज्यांच्या ठिकाणी तेज, बल यांची समृद्धी आहे, त्यालाच महानुभाव असे म्हटले जाते. पंथ म्हणजे मार्ग, अर्थात मोठ्या तेजाने युक्त असलेल्या लोकांचा जो मार्ग त्यालाच महानुभाव पंथ असे म्हणतात. अशा या महानुभाव पंथाचा स्वीकार करण्यासाठी प्रत्येकास द्युत, मद्य, मांस, वेश्या, शिकार, चोरी, देवताभक्ती यांचा पूर्णतः कायम त्याग करून ईश्वराला शरण जावे लागते. श्री चक्रधर स्वामी हे या संप्रदायाचे संस्थापक अथवा प्रवर्तक हे ज्यावेळी महाराष्ट्रात आपल्या कार्याला प्रारंभ केला होता, त्यावेळी यादव रामदेवाची राजवट होती. त्यावेळी समाजात सामाजिक विषमता, जातियवाद, व्रतवैकल्य यासारख्या अनेक अनिष्ट रूढी परंपरांचे थैमान माजले होते. सामान्य माणसांचा सामाजिक, आर्थिक, अंधश्रद्धा आणि धार्मिक कोंडमारा होत होता. अशा या राक्षसी चक्रातून समाजाला बाहेर काढून समाजाला ज्ञानप्राप्ती देण्यासाठी श्री चक्रधर स्वामी पुढे आले. तत्कालीन समाजातील संस्कृत ही भाषा ज्ञानवंतांची असली, तरी श्री चक्रधर स्वामींनी समाजाला समजणाऱ्या लोकभाषेतून ज्ञानप्राप्तीचा मार्ग मोकळा करून दिला. या महानुभाव पंथातील अनेकांनी विपुल प्रमाणात वाङ्मयनिर्मिती केलेली आहे. संस्कृत भाषेमध्ये बंदिस्त करण्यात आलेले ज्ञान महानुभाव संतांनीच मराठी भाषेतून समाजाला दिले. महानुभाव पंथामध्ये गद्य व पद्य वाङ्मय विपुल प्रमाणात आहे. गद्य वाङ्मयातील 'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला गद्य व चरित्रग्रंथ असून या ग्रंथाचे लेखन म्हाइंभट यांनी केले आहे.

## कवयित्री महदंबेचे चरित्र

महानुभाव पंथातील एक श्रेष्ठ व आद्य कवयित्री म्हणून महदंबेचा यथार्थ गौरव केला जाते. वायेनायक व कामाइसा यांच्या पोटी महदंबेचा जन्म झाला. कवयित्री महदंबेचे जन्मस्थळ व जन्मवर्ष याविषयी अभ्यासक व संशोधकामध्ये एकमत दिसून येत नाही. 'गोदावरी तीरावरील पुरी (पांढरी), ता.अंबड जि.जालना येथे राहणारी महदंबा, रामसगांव, जि.औरंगाबाद येथील वायेनायकाच्या पोटी जन्मास आली. महानुभाव पंथाचे पहिले आचार्य नागदेवाचार्य उर्फ (भटोबास) यांची ही चुलत बहीण होय.'[१] कवयित्री महदंबा हिचे मूळ नाव रूपाई किंवा रूपाबाई आहे, पण ती महदाईसा, रूपाईसा याही नावाने ओळखली जाते. महदंबेच्या असाधारण गुणांमुळे व तिच्या विदुषी पणजीवरून श्रीचक्रधर स्वामींनी तिचे नामकरण 'महदाइसा' असे केले, त्यानंतर श्री केशिराजांनी याच नावाचे संस्कृतीकरण 'महदंबा' असे केले, याचा उल्लेख केसोबांनी आपल्या 'रत्नमाला स्तोत्रम' या संस्कृत काव्यात केला आहे. कवयित्री महदंबा यांची चरित्रविषयक माहिती 'लीळाचरित्र', 'ऋद्धिपूरलीळा' व 'स्मृतिस्थळ' यात विखुरल्याचे दिसून येते. महदंबा यांच जन्म साधारपणे इ.स.१२४२ मध्ये, तर मृत्यू हा साधारणपणे इ.स.१३१२ हा मानला जातो. कवयित्री महदंबेचा ज्या घरात जन्म झाला ते तिचे घराणे विद्वान पंडिताचे होते. महदंबेचे पणजोबा वामनाचार्य हे यादव राजांच्या दरबारात पुरोहित होते, तर तिची पणजी महदाईसा ही विद्वान पंडित होती.

महदंबेला वैवाहिक जीवनाचे सुख अल्पकाळ मिळाले. पतीचे निधन झाल्यामुळे बालवयातच तिला विधवा व्हावे लागले. पती निधनानंतर ती वडिलांकडे परत आली. मात्र महदंबेच्या पतीचे नाव काय होते, त्यांचा विवाह व मृत्यू केव्हा झाला याविषयीची माहिती प्राप्त होऊ शकत नाही. महदंबेने आपले सर्व दुःख विसरून तीर्थयात्रा, देवपूजा करीत करीत साधू-संतांच्या सहवासात राहत असत. यामुळे तिला पुढे भक्तिमार्गाची व परमार्थाची ओढ लागली. कवयित्री महदंबा यांना सत्तर वर्षाचे आयुष्य लाभले. शेवटी इ.स.१३१२ मध्ये आजारी पडून तिचा मृत्यू झाला.

## महदंबेची काव्यरचना

कवयित्री महदंबेला प्रतिभेचे जणू वैभव लाभलेले होते. ती जशी चिकित्सक होती, तशीच ती जिज्ञासू, डोळस व विवेकशील होती. श्रीचक्रधरस्वामीमुळे महदंबेला जगण्याचा मार्ग व जीवनाचा अर्थही मिळाला होता, तसेच मुक्तीचाही मार्ग तिला प्राप्त झाला होता. तिला चिंतनाची व विचारांची बैठक प्राप्त झाली होती. याच तत्त्वचिंतनातून महदंबेनी पुढील काव्यरचनांची निर्मिती केली. १) मातृकी रूक्मिणी स्वयंवर, २) गर्भकांड ओव्या, ३) स्फुट पदे, ४) धवळे

## मातृकी रूक्मिणी स्वयंवर

कवयित्री महदंबेने म्हाइंभट व लक्ष्मीधरभट्ट यांच्या आज्ञेनुसार ११० ओव्यांचे जे दीर्घ काव्यलेखन केले आहे, ते 'मातृकी रूक्मिणी स्वयंवर' हे होय. या स्वयंवरात कृष्णरूपाचे सुंदर वर्णन केले आहे. या काव्यरचनेच्या कडव्यामधील आद्याक्षरात मातृका आणल्या आहेत. धवळ्यातील अनेक शब्द या काव्यरचनेत आढळतात. या काव्याविषयी वा.ना.देशपांडे म्हणतात, 'धवळे या ध्वनीचा 'मातृकी रूक्मिणी स्वयंवर' हा शुद्ध प्रतिध्वनी आहे.' वरचे रूप हे वेगळे असले तरी कथा मात्र

तीच आहे. या काव्यरचनेत कोमलता असून रचना प्रवाही आहे. यात व्यक्तिदर्शन व प्रसंगवर्णन हे त्रोटक स्वरूपात आलेले आहे. महदंबेने प्रारंभीच श्रीकृष्णाचे वर्णन केलेले आहे.

महदंबेची ही काव्यरचना छोटी असली तरी यात गतिमानता, प्रभावी व्यक्तिरेखाटन, चित्रमयता आणि भावप्रकटन यांचे यथार्थ दर्शन होते. महदंबेने यात रूक्मिणीच्या विविध सूक्ष्म रंगछटा चिकित्सकपणाने टिपलेल्या आहेत. महदंबेच्या या काव्यरचनेत शृंगार रस, वीररस आणि भक्तिरसही आहे. स्थळवर्णन व प्रसंगवर्णनांचे चित्रणही तिने टिपले आहे. 'रूक्मिणीपुढे निर्माण झालेला पेच, सुदेवाच्या मदतीने तिने त्यातून काढलेला मार्ग, त्यातून उद्‌भवलेला संघर्ष, त्या संघर्षावर कृष्णाने केलेली मात व शेवटी प्रेयसी आणि प्रियकर, भक्त आणि भगवंत यांचे झालेले मिलन हा सारा कथाभाग नाट्यपूर्ण पद्धतीने आणि रसाळपणे या आख्यानक काव्यात आपल्यापुढे साकार होतो.'[२] श्रीकृष्ण व रूक्मिणी यांचा विवाह महदंबेने अतिशय भक्तिमार्गाने रंगविला आहे.

## गर्भकांड ओव्या

'गर्भकांड ओव्या' हे महदंबेचे काव्य अध्यात्म व उपदेशविषयक आहे. या 'गर्भकांड'च्या काव्याचा प्रारंभ पुढीलप्रमाणे झाला आहे.

ॐ नमो आदिबीजा : परमार्था सहजाः
श्रीगुरू आदिराजाः नमन माझेः ।।१।।

या काव्यरचनेमध्ये श्रीचक्रधरस्वामींना नमन करून त्यांनी केलेल्या कृपेचा व आशीर्वादाचा उल्लेख यात करण्यात आलेला आहे. यात ओवींची संख्या किती आहे, हे मात्र निश्चितपणे सांगता येत नसले तरी, महंत दत्तराजांच्या प्रतीमध्ये ७५ ओव्या असल्याचा उल्लेख आहे. मात्र महदंबेच्या 'गर्भकांडा'तील या ओव्या नसून अभंग असल्याचे अभ्यासक व संशोधकांचे म्हणणे आहे. ओवी हा शब्द वृत्तवाचक नसून पूर्वी स्त्री गीतास 'ओव्या' म्हणत असत, त्याच अर्थाने 'ओवी' हा शब्द येथे वापरण्यात आल्याचे आजगांवकर ज.र. यांना वाटते. 'गर्भकांड'चा शेवट खालील ओवीने झाला आहे.

'विखयांचे गडदरे : त्येजवीले दातारें :'
स्वामी चक्रधरेः महदंबेसी : ।।७५।।

## स्फुटपदे

आद्य कवयित्री महदंबेने काही प्रमाणात स्फुट पदे लिहिली असावीत असा निर्वाळा वा.ना.देशपांडे यांनी दिलेला आहे. त्यांना महदंबेची जी जीर्ण झालेली पोथी सापडली त्यात पुढील काही स्फुट रचना दिसून येतात.

अमरगाण गगनी पाहाति आनंदेः
काव्य-दमन केले रायें गोविंदेंः ।।धृ।।
भुजंग जीवौनि आले मुरारीः
ब्रीद्रावली पुढां पढती नागारीः ।।छ।।
माहादाइसाचे स्वामी श्रीसर्वेस्वरूः
तो पाहे वो सुंदरी परमेश्वरूः ।।१।।[३]

श्री ना.ग.जोशी यांनी 'प्राचीन गीतमंजूषे' मध्ये महदंबेच्या काही रचना देऊन त्या रचनेमागील घटनाही स्पष्ट केल्या आहेत. 'महदंबा रवा काढीत असताना ओव्या गात होती. तेवढ्यात म.चक्रधर तेथे आले, त्यांना त्या ओव्या खूप आवडल्या. पण पुढे त्यांच्या संभाषणामुळे गीत अपुरेच राहिले. हा ५ ओव्यांचा गुच्छ आहे. 'अक्रूर गीत' प्रथम उल्लखतो'[४]

डॉ. इंदूमती शेवडे यांच्या म्हणण्यानुसार, 'महादाइसेची स्फुट रचनाही भाव कविता आहे व भक्तीने ती स्फुटित झालेली आहे. महादाइसेची सारी कविता स्वयंपूर्ण व उत्स्फूर्त आहे' महदंबा ही घरकाम करीत असताना ती सहजपणे ओव्या गात असत, याकडेही डॉ.इंदूमती शेवडे यांनी निर्देश केलेला आहे. अशा स्फुट स्वरूपात असलेल्या तिच्या ओव्यांची संख्या ही अधिक असल्याची शक्यता आपणास नाकारता येणार नाही.

## धवळे

धवळे यातील 'धवळ' हा शब्द 'धवल' या संस्कृत शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ 'विवाहप्रसंगात वरविषयक गावयाचे गीत' असा आहे. 'धवळ' हा वरप्रशस्तीपर म्हणजे नवरदेवाची स्तुतिगान करणारा गीतप्रकार आहे.

दासोपंताच्या काव्यातही 'ढवळा' या गीताच उल्लेख आहे, परंतु वरविषयक गीत लिहिण्याचा प्रथम सन्मान मात्र महदंबेलाच द्यावा लागतो. 'धवळे' ही महदंबेची स्वतंत्र निर्मिती आहे. महदंबेच्या या 'धवळ्या'चा प्रथम उल्लेख 'श्रीगोविंदप्रभुचरित्रा'त आढळतो. धवळे या साहित्यप्रकाराला मुक्त ओवी म्हणता येईल, यातील प्रत्येक कडव्यात चार चरण येतात. कन्नड कवी द.श.बेंद्रे यांनी धवळ्याचा उगम द्राविड 'अक्कर' प्रकारच्या छदाकडे निर्देश करतात. डॉ.ना.ग.जोशी यांच्या मतानुसार 'धवळ्या'च्या या रचनेमध्ये अष्टमात्रक आवर्तने दिसून येतात. अशा या धवळ्याच्या रचनेतील आशयामध्ये सूक्ष्म लयबद्धता प्रतिबिंबीत होते. धवळ्याचे स्वरूप हे एखाद्या प्रासंगिक कवितेसारखे आहे. एखाद्या विशिष्ट प्रसंगाची आधीच कल्पना करून कविता लिहिणे व त्यानंतर वाचणे किंवा लयबद्ध करून गाणे असे या धवळ्याचे स्वरूप असते. सुहासिनी इर्लेकर यांच्या मते, 'धवळे हे कथाकाव्य रूक्मिणीहरण कथेसंबंधिच्या आपल्या स्मृतिबंधाचा केलेला वाङ्मयीन आविष्कार होय.' तर डॉ.उषा देशमुख यांच्या मते 'श्रीकृष्ण रूक्मिणी विवाह कथेकडे कवयित्री एका श्रृंगार कथेच्या भूमिकेतून बघत नसून तिचे भक्तिमूल अंतःकरणच धवळ्यामधून अभिव्यक्त होते.' म्हणून महदंबेचे धवळे हे वरविषयक गीत मराठीतील पहिले विवाह कथाकाव्य ठरावे, यात कोणतीही शंका नसावी.

महदंबेचे 'धवळे' हे इ.स.१२८८ च्या दरम्यान पूर्वार्ध व हे इ.स.१३१२ पूर्वी उत्तरार्ध रचले असावेत असा भाषा अभ्यासक व संशोधकांचा अंदाज आहे. 'धवळे' हे पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागात विभागले असून पूर्वार्ध हा भाग श्रीगोविंदप्रभूमुळे पूर्ण झाले आहे, तर धवळ्याचा उत्तरार्ध हा म्हाइंभट्ट व लक्ष्मीभट्ट यांच्या आग्रहास्तव गायिल्या गेले किंवा तशी ती रचना करण्यात आली. धवळ्याच्या या पूर्वार्धात एकूण ८४ कडवी आहेत, तर उत्तरार्धात ६४ कडवी आहेत. धवळ्याच्या पूर्वार्ध व उत्तरार्धात एकूण १४८ कडवी आहेत. महदंबेचे हे धवळे सौंदर्याने भरलेले आहे. यात प्रसंग चित्रण, व्यक्तिचित्रणाबरोबरच गतिमानता आहे. श्रीचक्रधर स्वामींच्या प्रयाणानंतर श्री नागदेवाचार्य सर्व परिवारासह श्री गोविंदप्रभूंच्या सानिध्यात असताना एका प्रसंगाच्या निमित्ताने महदंबेला काव्य स्फुरले. 'एक तेलीण वधुवरांसाठी बाशिंग घेऊन चालली होती. महादाइसेनी तिला श्रीगोविंदप्रभुसाठी एक बाशिंग देण्याबद्दल विनंती केली. बाशिंग घेऊन तिने श्रीप्रभुंच्या श्रीमुगुटी बांधले. श्रीप्रभूंना हळद लावली. वाजंत्र्याने वाद्ये वाजविली. वडे, मांडे तळगे गेले. जेवणावळी झाल्या. श्रीप्रभू हसले. त्याच अवस्थेत महदाइसाना सांगितले 'आवो मेली जाए गाए म्हणे' महादाइसा म्हणाल्या 'काइ गाओजी?' यावर श्रीप्रभू म्हणाले 'आवो कृष्ण–रूक्मिणी गाए गाए म्हणे : तुरया थाट गाये म्हणे' अशा प्रकारे महादाइसांनी श्रीप्रभूंच्या आज्ञेवरून जे गीत गाइले, तेच 'धवळे' म्हणून प्रसिद्ध पावले.'[५] श्रीगोविंदप्रभूचरित्रातील 'वीव्हावो स्वीकारू' चा प्रसंग धवळ्याच्या निर्मितीसाठी निमित्तमात्र व एक योगायोग आहे. 'गाणे' हे धवळे ग्रंथबद्ध होण्यासाठी निमित्त ठरू शकले. श्रीचक्रधरस्वामींच्या श्रीकृष्णचरित्रविषयक चिंतनाला सर्वाधिक बोलके व जिवंत करण्याचे काम महदंबेने केले आहे. श्रीचक्रधरांच्या वाणीला महदंबेने खऱ्या अर्थाने काव्यरूप दिले आहे. श्रीचक्रधर आणि महदंबा या दोघांचेही श्रीकृष्णविषयक मनन व चिंतन अखंडपणे चालू होते, यावरून हे आपल्या लक्षात येते. यातील श्रीचक्रधरंचे चिंतन हे गद्यरूपात आले आहे, तर महदंबेचे चिंतन हे काव्यरूपात प्रकट झाले आहे.

## धवळे : पूर्वार्ध

'धवळ्या'च्या पूर्वार्धाचा प्रारंभ महदंबेने महानुभाव पंथातील काही व्यक्तिंचा श्रीकृष्णाचाही निर्देश केला आहे. महदंबेच्या पूर्वार्ध 'धवळ्या'मध्ये ८४ कडवी आहेत. या तिच्या धवळ्याच्या पूर्वार्धामध्ये 'रूक्मिणीहरण' कथेचे चित्रण आहे. महदंबेने 'रूक्मिणी' हरणाची ही कथा काव्यबद्ध करीत असताना ती भागवतावर अवलंबून राहत नाही. रूक्मिमुळे रूक्मिणीचे कृष्णाशी होणारे लग्न मोडल्या जाते व ते लग्न कृष्णाऐवजी शिशुपालाशी ठरविले जाते. या प्रसंगाचे महदंबेने रूक्मिणीच्या विरहावस्थेने निवेदन दिले आहे. रूक्मिणी स्वतःस 'सखि धाडूनिया' सुदेवास बोलावून कृष्णाविषयीच्या आपल्या ह्रदयातील भाव व आत्मप्रकटीकरण मोकळी करते. सुदेव द्वारकानगरीस जातो व श्रीकृष्णाची भेट घेऊन रूक्मिणीचा निरोप सांगतो. त्यानंतर श्रीकृष्ण आपल्या सेनेसह कुंडीनपुरात प्रवेश करतो, तेव्हा रूक्मिणी आपल्या माडीवर उभी राहून प्रथमच श्रीकृष्णास पाहून आपला देहभान विसरून जाते. रूक्मिणीने ज्या विश्वासाने सुदेवाला जी जबाबदारी दिली होती, ती जबाबदारी सुदेवाने पूर्ण केली होती आणि साक्षात श्रीकृष्णच तिच्यासमोर उभा राहतो, परंतु श्रीकृष्ण हा रूक्मिणीसोबत विवाह करण्यास तयार असल्याची वार्ता रूक्मिणीस मिळणे आवश्यक होते. रूक्मिणीला श्रीकृष्णाचे प्रथमच दर्शन झाले होते. श्रीकृष्णाच्या दर्शनामुळे रूक्मिणीला प्रचंड आनंद झालेला आहे. आनंदाच्या भरात ती माडीवरून खाली येताना सुदेव तिला सावरतो. या रूक्मिणीच्या अवस्थेचे वर्णन करताना महदंबेने 'सावरीली बाळी' अशा शब्दात करते. रूक्मिणीच्या मूक मनातील भावना श्रीकृष्णास सांगण्यासाठी तिच्या मैत्रिणीही देहभान हरवून पुढे येतात. सुदेवाच्या हाती रूक्मिणीने श्रीकृष्णास रूखवत पाठविते, श्रीकृष्णाने आपल्या प्रेमाचा

स्वीकार म्हणून 'कौस्तुभहार' पाठवितो व तो हार रूक्मिणी अत्यंत प्रेमाने आपल्या गळ्यात घालते. 'ते सुख केवि वर्णु जैसा मीनला प्रीयो गोविंदु' अशा शब्दात रूक्मिणीच्या अवस्थेत वर्णन यात आले आहे.

श्रीकृष्णाच्या सौंदर्याविषयी रूक्मिणी बेभान होते. श्रीकृष्ण दर्शनामुळे रूक्मिणीच्या दासी व सख्याही बेभान होतात. श्रीकृष्णाची स्तुती तिच्या कानी पडताच रूक्मिणी भानावर येते. यानंतर पुढे ६८ ते ७५ पर्यंतच्या कडव्यांमध्ये विवाहविषयक सोहळ्याचे वर्णन आहे. श्रीकृष्ण व रूक्मिणीच्या विवाह सोहळ्यात यशोदा व देवकीने रूक्मिणीच्या स्नानाची तयारी केली आहे. विवाह सोहळ्यास आलेल्या यादव पांडवांची गर्दी आहे. श्रीकृष्ण व रूक्मिणीच्या शृंगाराचेही महदंबेने केलेले वर्णन अप्रतिम आहे, हे महदंबेच्या प्रतिभेची साक्ष म्हणावी लागेल. कृष्ण रूक्मिणी मिलनाच्या प्रसंगावरही महदंबेने प्रकाश टाकला आहे. विवाहप्रसंगी श्रीकृष्णाला वरमाला घालताना रूक्मिणी ही श्रीकृष्णाच्या अतिनिकट आल्याचा प्रसंगही शब्दबद्ध झाला आहे. महदंबेने रूक्मिणीच्या बाह्यसौंदर्याचे वर्णन टाळून तिच्या अंतरंगातील मूल भावना टिपल्या आहेत. शेवटी श्रीकृष्ण व रूक्मिणी यांच्या मिलनाचा प्रसंग हा 'रूक्मिणीहरण' कथेचा उत्कर्षबिंदूच म्हणावा लागेल. रूक्मिणीच्या प्रेम साफल्याची कृतज्ञता महदंबेने 'बोलिजो कृपावंता ते देवा आजि जाले साचः' या शब्दात व्यक्त केली आहे. जेव्हा रूक्मिणी श्रीकृष्णाला वरमाला घालते, त्याप्रसंगी महदंबेच्या धवळ्याचा पूर्वार्ध संपतो.

## धवळे : उत्तरार्ध

धवळ्याच्या उत्तरार्धामध्ये ६४ कडवी आहेत. 'स्मृतिस्थळात धवळ्यांच्या उत्तरार्धासंबंधीची ही जी माहिती आढळते, त्यावरून धवळे उत्तरार्धाच्या कर्त्यासंबंधी निश्चित विधान करता येणे शक्य नसले, तरी त्यासंबंधी काही अंदाज बांधता येतो. धवळ्यांच्या उत्तरार्धाच्या निर्मितीसंबंधी स्मृतिस्थळात येणाऱ्या प्रस्तुत उल्लेखावर प्रमाणाबाहेर विसंबून राहणाऱ्यांनी उत्तरार्धाच्या रचनेचे कर्तृत्व म्हाइंभट व लक्ष्मीधरभट्ट यांना देऊन टाकले आहे आणि यात फारसे आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. प्रस्तुत स्मृतीतच 'मग तेहीं शब्द घडउं घडउं पदें बांधिलीः आणि महादाइसी गाइलीं' असे स्मृतिस्थळकारांनीच सांगून ठेवले आहे.'[६] डॉ.तुळपुळे यांनी धवळ्याच्या उत्तरार्धाचे बरेच श्रेय म्हाइभट्ट व लक्ष्मीधरभट्ट यांना दिले आहे. तसेच या धवळ्यावरून महादाइसेचा हात फिरल्याचे अनेक भाषा अभ्यासक, विचारवंत व संशोधक मान्य करून धवळ्याच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व महदंबेलाच देतात. मात्र डॉ.कोलते यांनी धवळ्याच्या उत्तरार्धाची रचना ही म्हाइंभटाने केली हेच गृहीत धरले आहे. धवळ्याच्या उत्तरार्धासाठी महदंबेला म्हाइंभटांनी साहित्य पुरविले हे निर्विवाद सत्य असून शेवटी धवळ्याच्या या उत्तरार्धाचे कर्तृत्व महदंबेलाच द्यावे लागते.

श्रीकृष्ण रूक्मिणी विवाहकथा ही खऱ्या अर्थाने धवळ्याच्या पूर्वार्धात संपल्याने धवळ्याच्या उत्तरार्धाविषयीचे काव्य महदंबेला स्फुरतच नव्हते. 'मज काइ करवैलः तै गोसावी वरू दीधला म्हणौनि स्फुरले.' अशा शब्दात ती धवळ्याचा उत्तरार्ध टाळण्याचा प्रयत्न करते.

## धवळे : काही निरीक्षणे

कवयित्री महदंबेचे व्यक्तिमत्त्व हे उत्तम प्रतिभेचे असल्यामुळे त्यांनी 'धवळे' या सुंदर अशा काव्याची निर्मिती केली आहे. महदंबेचे हे आद्य काव्य होय. या धवळ्यामध्ये प्रसंगाचे क्षण आणि व्यक्तिचित्रणाबरोबरच अकृतिम साधेपणाचा गुणही आहे. धवळ्याच्या प्रारंभापासून ते अखेरपर्यंत कथानिवेदनात गतिमानता आहे. विविध प्रसंग आणि कथानकाच्या माध्यमातून हे कथाकाव्य वाचकांच्या मनाची पकड घेते. धवळ्याची निर्मिती ही एका प्रसंगातून झाली असून या प्रसंगामुळेच या गीतरचनेला प्रेरणा मिळाली आहे. यामुळे धवळ्यातून एका स्त्रीमनाचा उत्स्फूर्तपणे वाङ्मयीन आविष्कार झाल्याचे दिसून येते. धवळ्याच्या रूक्मिणीहरणातील जवळपास सर्वच व्यक्तिचित्रे ही श्रीकृष्णभक्त आहेत. धवळ्यामध्ये कल्पनावैभावाची अप्रतिम रचना करण्यात आली आहे. रूक्मिणी, श्रीकृष्ण, सुदेव, रूक्मी, भीमक, बलराम आणि रूक्मिणीच्या अनेक सख्या यांचे व्यक्तिचित्रणही प्रभावीपणे रेखाटण्यात महदंबेला यश आले आहे.

धवळ्याच्या या रूक्मिणीस्वयंवरामध्ये महदंबेने तत्कालीन समाजाच्या चालीरिती, रूढी-परंपरा अधोरेखित केल्या आहेत. तत्कालीन समाजातील विविध वाद्ये, अलंकार, टाळ, लग्नविधी, घोडे, पालख्या, कपडे, सोने, कुंडले, स्त्रियांच्या बांगड्या, चंदन, कपाळावरील कस्तुरी टिळा, औक्षण, रूखवत, बाशिंग, ओवाळणी, नृत्य इत्यादी सामाजिक चालिरितीं यात अधोरेखित करण्यात आल्या आहेत.

धवळ्याची भाषा ही बोलीभाषा आहे. ती आशयनिष्ठ आहे. धवळे वाचत असताना धवळ्याच्या भाषेमुळे वाचकाचे लक्ष विचलीत होत नाही. साधारणतः बाराव्या-तेराव्या शतकातील महाराष्ट्राची जी बोलीभाषा होती, त्याच बोलीभाषेतून महदंबेने

धवळे शब्दबद्ध केले आहे. धवळ्यामध्ये अलंकारचा वापर काव्याला सजविण्यासाठी झाला नसून तो बोलीभाषेमुळे झाला आहे. धवळ्याच्या भाषेत साधेपणा प्रकर्षाने जाणवतो. धवळ्यातील कथाकथन आणि कथागायन एकरूपाने प्रकट झाल्याचे दिसून येते. म्हणून धवळ्याची भाषा ही पद्यात्मक गद्य व गद्यात्मक पद्य अशा स्वरूपाची आहे. पराक्रमातील शूर व कीर्तीवान महापुरूषांचे गुणगायन करण्यासाठी 'धवलगीत' हा काव्यप्रकार अस्तित्वात आला असल्यामुळे महदंबेच्या 'धवळे' या कथाकाव्याला 'धवलगीतही' म्हणता येईल. धवळ्याच्या या निर्मितीमुळे मराठी भाषेचे वाङ्मयीन व ऐतिहासिक मूल्य वाढले आहे.

## निष्कर्ष :

१) महदंबेला बालपणीच वैधव्य आले असले तरी श्रीचक्रधरस्वामीच्या भेटीमुळे तिच्या जीवनाला नवी संजीवनी प्राप्त झाली.
२) कवयित्री महदंबा ही कर्तव्यदक्ष व शिस्तप्रिय स्त्री असून ती आपल्या वडिलांचा विरोध सहन करून आपल्या स्वतःच्या विवेकशील बुद्धीने श्रीचक्रधर स्वामींच्या शिष्यत्वाचा स्वीकार केला होता.
३) महदंबा ही प्रज्ञावंत, प्रतिभेचे वैभव लाभलेली आद्य कवयित्री असली तरी स्त्रीने ती वीरक्त व वैराग्यातील वृत्तीची होती.
४) महदंबा ही श्रीचक्रधरस्वामींचा शब्द प्रमाण मानीत असत, कारण मोक्षाचा मार्ग दाखविणारे श्रीचक्रधरस्वामी हे तिच्यासाठी साक्षात ईश्वरच होते.
५) श्रीचक्रधरांच्या संस्कारामुळेच महदंबेच्या विचारशक्ती, जिज्ञासूवृत्ती व तिच्या कवितामनाला बौद्धिक व मानसिक शक्ती मिळाली. तिच्या व्यक्तिमत्त्वाची सर्व अंगे ही श्रीचक्रधरामुळेच विकसित झाली होती.
६) 'धवळ्या'तील कथानिवेदन व्यक्तिचित्रे, प्रसंगनिर्मिती, भावदर्शन यासारखी कथेची सर्वच अंगे महदंबेच्या या कथाकाव्यात स्पष्टपणे जाणवतात.
७) धवळ्यातील कथानिवेदन हे गतिमानतेमुळे त्यास चलत्चित्रदर्शनाचे स्वरुप प्राप्त झाले असून महदंबेने पंथीय व गुरूपरंपरेचा अभिमान न बाळगता रूक्मिणी स्वयंवर कथाकाव्याच्या प्रारंभापासून ते शेवटपर्यंत न्याय दिला आहे.
८) यमक हा मराठी छंदोबद्ध काव्याचा कणा असून महदंबेने धवळ्यामध्ये यमकाचे भान राखून त्याचा प्रभावी आविष्कार केला आहे.
९) महदंबेला अकालीच वैधव्य आल्यामुळे ती वृत्तीने वैराग्यशील बनली असली तरी, तिने श्रीचक्रधराप्रमाणेच सामाजिक चालिरिती, आचार-विचार यांचा कोणताही विचान न करता पारमार्थिक मार्ग स्वीकारला. अनेक सामाजिक संकेत झुगारून देऊन या तसेच विधवा स्त्रीने दीक्षा घेतली ही एक ऐतिहासिक सामाजिक क्रांतीच होती.
१०)महदंबा ही अत्यंत जिज्ञासू व कुशाग्र बुद्धिमान होती. महानुभाव पंथाच्या आचारधर्माचे पालन करणारी ती एका स्वतंत्र विचाराच्या वृत्तीची होती. तिची प्रज्ञा व प्रतिभा तेजस्वी होती. संन्यासी वृत्तीचा मार्ग स्वीकारूनही तिने मराठी साहित्याच्या इतिहासात 'आद्य कवयित्री' म्हणून अजरामर झाली आहे.

## संदभग्रंथ

१) विद्यासागर पाटंगणकर (संपा.), मराठी संतकवयित्रीचा इतिहास, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, प्रथामावृत्ती २०१५, पृ.क्र.३.
२) डॉ.सौ.शैला गावंडे, १० संत कवयित्री, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.
३) प्राचार्य मा.के.यादव, मराठी संत कवयित्री, स्नेहवर्धन पुणे, प्रथामावृत्ती, पृ.क्र.२२.
४) तत्रैव, विद्यासागर पाटंगणकर.
५) डॉ.सुहासिनी इर्लेकर, संत कवी आणि कवयित्रीः एक अनुभव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, संस्कारित आवृत्ती २००६, पृ.५५.



**प्रा. डॉ. माधव बसवंते**
**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख , राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड.**